सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/शै.वि-४/२०२५/ 615 दिनांक : 20 FEB 2025

**महत्वाचे परिपत्रक-**

**प्रति,**
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
शासकीय,अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
पदवी व पदविका संस्था पुणे विभाग,

**विषय : राष्ट्रीय सेवा योजनेंअतर्गत, दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी, राज्यातील विविध शिबीर उपक्रम राबविणेबाबत..**

संदर्भ- १. संचालनालयाचे पत्र E-Office File No.DTEM-D90PLAN/25/2025-DESK9
२. राज्य संपर्क अधिकारी,राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालयीन कक्ष मुंबई यांचे पत्र क्र.रासेयो-२०२५/प्र.क्र.१७/रासेयो, दि.१३फेब्रुवारी, २०२५

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की,

सर्व अकृषी विद्यापीठे यांच्या माध्यमातून **दि.२६ फेब्रुवारी, २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्र राज्यात रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर या दोन महत्वाच्या विषयांवर उपक्रम राबविण्याचे योजिले आहे.** स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपले संपूर्ण जीवन स्वातंत्र्यासाठी वेचले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर हे उपक्रम जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमार्फत अत्यंत उपयुक्त ठरेल. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान करणे व नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजित करणे म्हणजेच एखादयाचे प्राण वाचविणे व त्याला जीवदान देणे होय. जेणे करून या उपक्रमांबाबत समाजातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करता येईल तसेच रक्तदान व नेत्रदान यासारख्या जीवनरक्षक देणग्यांच्या माध्यमातून होणाऱ्या सकारात्मक परिणामांबद्दल जागरूकता वाढविणे तितकेच महत्वाचे आहे.

या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका संस्थामधील <u>**राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्या माध्यमातून**</u> रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजित करण्यात यावे. तसेच सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका संस्थामधील संबंधित विद्यापीठांशी समन्वय साधुन उपरोक्त कार्यवाही करावी.

**रक्तदान शिबीर आयोजन-**

भारतात रक्ताची मागणी व पुरवठा यात मोठी तफावत आहे. रक्त आणि रक्तदात्याच्या अनुपलब्धततेमुळे मौल्यवान मानवी जीवन वाचविणे शक्य होत नाही. रक्तदान वैद्यकीय प्रक्रियांना आधार देते आणि अनेक रुग्णांसाठी जीवन आणि मृत्यू यांच्यातील फरक असू शकते. रक्तदान शिबीर आयोजित करणे हा उपक्रम प्रामुख्याने विद्यार्थी रक्तदात्यांना प्रोत्साहन देणे, समाजाची अशा स्वरूपाची तातडीची मदत करण्याचे मुल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे. वैद्यकीय आणीबाणीच्या वेळी सहज उपलब्ध होऊ शकतील अशा तरुणांचा/युवकांचा समुह किंवा गट निर्माण करणे आणि रक्तदानाविषयीचे वैज्ञानिक ज्ञान वृध्दिंगत करणे व त्या विषयीचे मिथक किंवा चुकीच्या संकल्पना दूर करणे या उद्देशाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात यावे. सदर उपक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित करावे तसेच स्थानिक रक्तपेढी यांच्याशी संपर्क करून सदर शिबीर आयोजित करावा. या शिबिरात रक्तदान केलेल्या विद्यार्थ्यांची इत्यंभूत माहिती अथवा तपशिल (नाव, वर्ग, मोबाईल नंबर , वय, उंची, वजन, घरचा पत्ता व रक्तगट) इत्यादिंची माहिती संकलित करून जतन करावी व सदरचे तपशीलवार माहिती जवळच्या रक्तपेढीलाही देण्यात यावी. जेणेकरून भविष्यात एखाद्या आणिबाणीच्या प्रसंगी रुग्णाला जो रक्तगट लागू होतो तोच उपलब्ध करून देता येईल.

**मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजन-**

रक्तदानाप्रमाणेच मरणोत्तर नेत्रदान करणे सुध्दा महत्वाचे कार्य आहे. ज्याप्रमाणे रक्तदान करण्याची निवड करणाऱ्या व्यक्तींच्या नि:स्वार्थतेवर प्रकाश टाकते त्याचप्रमाणे अंधत्वाने ग्रस्त असलेल्या असंख्य व्यक्तींची दृष्टी पूर्ववत करण्यात आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यात नेत्रदान महत्वाची भूमिका बजावते. वैद्यकीय विज्ञानातील प्रगतीमुळे, पारपटल प्रत्यारोपणाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच नेत्रदान करणारा देणगीदार हा या उपक्रमाचा महत्वाचा कणा आहे. नेत्रदानाच्या या उदात्त कार्याला प्रोत्साहन देण्याच्या मोहिमेला विद्यापीठ समुदायामध्ये तसेच महाविद्यालयांतील स्वयंसेवकांच्या पाठिंब्याची खूप आवश्यकता आहे. जीवन बदलणाऱ्या या प्रयत्नात सहभागी होण्यासाठी आपण एकत्रितपणे अधिकाधिक व्यक्तींना प्रेरित करू शकतो.

याअनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संबंधित संस्था व महाविद्यालयाने स्थानिक नेत्रपेढीशी संपर्क साधावा. महाविद्यालयाने त्यांच्या शहरातील, त्यांच्या परिसरातील किंवा ओळखीच्या एखाद्या नेत्ररोगतज्ञाचे व्याख्यान आयोजित करावे. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये तसेच लोकांमध्ये मरणोत्तर नेत्रदान संदर्भात जनजागृती होईल. तेच विद्यार्थी आपल्या परिवारातील, आप्तेष्ट- नातेवाईकांमध्ये व परिसरातील लोकांमध्ये मरणोत्तर नेत्रदान करण्याबाबत जनजागृती करतील. त्याचबरोबर सदर दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी महाशिवरात्र असल्याने सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे दि. २६ फेब्रुवारी, २०२५ ऐवजी दि.२५ फेब्रुवारी, २०२५ रोजी नेत्रदानाचे शिबीर तसेच अधिकाधिक नेत्रदानाचे फॉर्म भरून घ्यावेत. त्याच प्रमाणे यु-टयूब वर देखील काही व्हिडोओ क्लिप्स उपलब्ध आहेत. त्या मुळे मरणोत्तर नेत्रदानाबाबत अधिक माहिती मिळू शकेल व त्याचा जनतेवर अत्यंत प्रभाव पडेल . त्यानुषंगाने सदर दि.२५ फेब्रुवारी,२०२५ रोजी जास्तीत-जास्त लोकांचा या उपक्रमात/ जनजागृती अभियानात सहभाग वाढविता येईल. सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ते दि. २५ फेब्रुवारी, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रत्यक्ष नेत्रदानाचे फॉर्म भरेपर्यंत महाविद्यालयांनी परिसरात उपलब्ध असलेले नेत्ररोगतज्ञ यांच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये नेत्रदानासंबंधीत व्याख्यान आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये पुरेशी जनजागृती करावी. तसेच महाविद्यालयाने यु-टयुब वरील नेत्रदानासंबंधीचे व्हिडिओ देखील मोठया (स्क्रीन) पडद्यावर विद्यार्थ्यांना दाखविण्यात यावेत. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये नेत्रदानाबाबत प्रभावीपणे जनजागृती होऊन ते इतरांनाही जनजागृती करण्यास तयार होतील. दि.२५ फेब्रुवारी,२०२५ रोजी प्रत्यक्ष नेत्रदानाचे डोनर प्लेजचे फॉर्म भरपूर प्रमाणात भरल्या जातील. त्याचदिवशी डोनर प्लेजचा फॉर्म भरून घेण्यात यावेत. अशा पद्धतीने महाविद्यालयांनी या मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान/शिबिराचे आयोजन करावे.

तंत्रनिकेतने व महाविद्यालयांनी उपरोक्त नमूद रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान/शिबीर या दोन्ही उपक्रमांचे आपल्या स्तरावर दि.२५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आयोजन करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाच्या ई-मेलवर संचालनालयास कळविण्यासाठी दि.२७.०२.२०२५ रोजी दु.०३.०० वाजे पर्यंत सादर करण्यात यावी.

( डॉ. द. व्यं. जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२९/४९०,
ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

---

E-Office File No.DTEM-D९०PLAN/२५/२०२५-DESK ९

महत्वाचे

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, नाशिक, अमरावती, पुणे, नागपूर व छ. संभाजीनगर.

विषयः-राष्ट्रीय सेवा योजनेंअतर्गत, दि. २५ फ़ेब्रुवरी, २०२५ रोजी, राज्यात विविध शिबीर उपक्रम राबविणेबाबत. . . .

संदर्भ :- राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालयीन कक्ष मुंबई यांचे पत्र क्रमांक : रासेयो-२०२५/प्र.क्र.१७/रासेयो, दि. १३ फेब्रुवारी, २०२५

आपल्या भारत देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची महत्त्वाची भूमिका दिसून येते. देशातील युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य हे देशातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून होत असते. युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्याचे कार्य, सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांव्दारे होत असते.

राष्ट्रीय सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना युवा कार्यक्रम आणि क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यांच्यातर्फे राबविण्यात येते. या योजनेंतर्गत वेगवेगळे उपक्रम, शिबिरे, कार्यक्रम व कार्यशाळांचे आयोजन महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थी स्वयंसेवकांच्या माध्यमातून राबविण्यात येते अथवा साध्य करता येते. सदर योजनेंतर्गत नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरे विशेषतः लोकाभिमुख असलेल्या विषयांवर राबविले जातात. नियमित कार्यक्रम जसे रक्तदान शिबीर, पल्स पोलिओ, आरोग्य/नेत्र चिकित्सा शिबीर, जनजागृती कार्यक्रम, स्वच्छता अभियान, श्रमदान, स्व-सुरक्षा प्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, रस्ता सुरक्षा अभियान, योगा प्रशिक्षण कार्यक्रम, जल संवर्धन कार्यक्रम, प्लास्टिक मुक्ती अभियान, ऊर्जा संवर्धन कार्यक्रम यांसारख्या कार्यक्रमांचा समावेश होतो.

सर्व अकृषी विद्यापीठे यांच्या माध्यमातून दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्र राज्यात रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर या दोन

महत्त्वाच्या विषयांवर उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपले संपूर्ण जीवन स्वातंत्र्यासाठी वेचले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर हे उपक्रम जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमार्फत अत्यंत उपयुक्त ठरेल. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान करणे व नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजित करणे म्हणजेच एखाद्याचे प्राण वाचविणे व त्याला जीवनदान देणे होय. जेणेकरून या उपक्रमांबाबत समाजातील लोकांमध्ये जागरुकता निर्माण करता येईल तसेच रक्तदान व नेत्रदान यासारख्या जीवनरक्षक देणग्यांच्या माध्यमातून होणाऱ्या सकारात्मक परिणामांबद्दल जागरुकता वाढविणे तितकेच महत्त्वाचे आहे.

या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित सर्व शासकीय, अशासकी अनुदानित, विनानुदानित पदविका संस्थामधील राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्या माध्यमातून रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजित करण्यात यावे. तसेच, सर्व शासकीय, अशासकी अनुदानित, विनानुदानित पदवी संस्थामधील संबंधित विद्यापीठांशी समन्वय साधुण उपरोक्त कार्यवाही करावी.

**रक्तदान शिबीर आयोजन:-**

भारतात रक्ताची मागणी व पुरवठा यात मोठी तफावत आहे. रक्त आणि रक्तदात्याच्या अनुपलब्धततेमुळे मौल्यवान मानवी जीवन वाचविणे शक्य होत नाही. रक्तदान वैद्यकीय प्रक्रियांना आधार देते आणि अनेक रुग्णांसाठी जीवन आणि मृत्यू यांच्यातील फरक असू शकते. रक्तदान शिबीर आयोजित करणे हा उपक्रम प्रामुख्याने विद्यार्थी रक्तदात्यांना प्रोत्साहन देणे, समाजाची अशा स्वरुपाची तातडीची मदत करण्याचे मुल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे. वैद्यकीय आणीबाणीच्या वेळी सहज उपलब्ध होऊ शकतील अशा तरुणांचा /युवकांचा समूह किंवा गट निर्माण करणे आणि रक्तदानाविषयीचे वैज्ञानिक ज्ञान वृध्दिंगत करणे व त्या विषयीचे मिथक किंवा चुकीच्या संकल्पना दूर करणे या उद्देशाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात यावे. आपल्या अधिनस्त महाविद्यालये यांना सदर उपक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित करण्याबाबत आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. तसेच स्थानिक रक्तपेढी यांच्याशी संपर्क करून सदर शिबीर आयोजित करावा. या शिबिरात रक्तदान केलेल्या विद्यार्थ्यांची इत्यंभूत माहिती अथवा तपशिल (नाव, वर्ग, मोबाईल नंबर, वय, उंची, वजन, घरचा पत्ता व रक्तगट) इत्यादिंची माहिती संकलित करून जतन करावी. व सदरचे तपशीलवार माहिती जवळच्या रक्तपेढीलाही देण्यात यावी. जेणेकरून भविष्यात एखाद्या आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णाला जो रक्तगट लागू होतो तोच उपलब्ध करून देता येईल.

**मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजन :-**

रक्तदानाप्रमाणेच मरणोत्तर नेत्रदान करणे सुध्दा महत्त्वाचे कार्य आहे. ज्याप्रमाणे रक्तदान करण्याची निवड करणाऱ्या व्यक्तींच्या निःस्वार्थतेवर प्रकाश टाकते त्याचप्रमाणे अंधत्वाने ग्रस्त असलेल्या असंख्य व्यक्तींची दृष्टी पूर्ववत करण्यात आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यात नेत्रदान महत्त्वाची भूमिका बजावते. वैद्यकीय विज्ञानातील प्रगतीमुळे, पारपटल प्रत्यारोपणाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच नेत्रदान करणारा देणगीदार हा या उपक्रमाचा महत्त्वाचा कणा आहे. नेत्रदानाच्या या उदात्त कार्याला प्रोत्साहन देण्याच्या मोहिमेला विद्यापीठ समुदायामध्ये तसेच महाविद्यालयांतील स्वयंसेवकांच्या पाठिंब्याची खूप आवश्यकता आहे. जीवन बदलणाऱ्या या प्रयत्नात सहभागी होण्यासाठी आपण एकत्रितपणे अधिकाधिक व्यक्तींना प्रेरित करू शकतो.

याअनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संबंधित संस्था व महाविद्यालयाने स्थानिक नेत्रपेढीशी संपर्क साधावा. महाविद्यालयाने त्यांच्या शहरातील, त्यांच्या परिसरातील किंवा ओळखीच्या एखाद्या नेत्ररोगतज्ञाचे व्याख्यान आयोजित करावे. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये तसेच लोकांमध्ये मरणोत्तर नेत्रदान संदर्भात जनजागृती होईल. तेच विद्यार्थी आपल्या परिवारातील, आप्तेष्ट- नातेवाईकांमध्ये व परिसरातील लोकांमध्ये मरणोत्तर नेत्रदान करण्याबाबत जनजागृती करतील. विद्यार्थी स्वतः पालकांमार्फत व नातेवाईकांमार्फत त्यांच्या परिसरातील रहिवाशांमध्ये नेत्रदान करण्याबाबत जनजागृती करतील. त्याचबरोबर सदर दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी महाशिवरात्र असल्याने सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ ऐवजी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी नेत्रदानाचे शिबीर तसेच अधिकाधिक नेत्रदानाचे फॉर्म भरून घ्यावेत. त्याचप्रमाणे यु-ट्यूब वर देखील काही व्हिडिओ क्लिप्स उपलब्ध आहेत. त्यामुळे मरणोत्तर नेत्रदानाबाबत अधिक माहिती मिळू शकेल व त्याचा जनतेवर अत्यंत प्रभाव पडेल. त्यानुषंगाने सदर दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी जास्तीत-जास्त लोकांचा या उपक्रमात / जनजागृती अभियानात सहभाग वाढविता येईल. सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ते दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रत्यक्ष नेत्रदानाचे फॉर्म भरेपर्यंत महाविद्यालयांनी परिसरात उपलब्ध असलेले नेत्ररोगतज्ञ यांच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये नेत्रदानासंबंधी व्याख्यान आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये पुरेशी जनजागृती करावी. तसेच महाविद्यालयाने यु-ट्यूब वरील नेत्रदानासंबंधीचे व्हिडिओ देखील मोठ्या (स्क्रीन) पडद्यावर विद्यार्थ्यांना दाखविण्यात यावेत. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये नेत्रदानाबाबत प्रभावीपणे जनजागृती होऊन ते इतरांनाही जनजागृती करण्यास तयार होतील. दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी प्रत्यक्ष नेत्रदानाचे डोनर प्लेजचे फॉर्म भरपूर प्रमाणात भरल्या जातील. त्याचदिवशी डोनर प्लेजचा फॉर्म भरून घेण्यात यावेत. अशा पद्धतीने महाविद्यालयांनी या मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान/शिबिराचे आयोजन करावे.

तंत्रनिकेतने व महाविद्यालयांनी उपरोक्त नमूद रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान/शिबीर या दोन्ही उपक्रमांचे आपल्या स्तरावर दि. २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आयोजन करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
Date: 18-02-2025 20:14:20

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवहीकरिता-

सर्व प्राचार्य/ संचालक
शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनानुदानित पदविका व पदवी संस्था
(अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र व तत्सम)